पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा.स्थायी समिति
**कार्यपत्रिका क्रमांक – १२८**
(सभावृत्तांत)

**दिनांक – १७/०७/२०१९** **वेळ – दुपारी ०२.३० वा.**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.स्थायी समितीची **साप्ताहिक** सभा बुधवार **दि.१७/०७/२०१९** रोजी दुपारी **०२.३०** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. **मा.मडिगेरी विलास हनुमंतराव – सभापती**
२. मा.गावडे राजेंद्र तानाजी
३. मा.आंगोळकर सागर सुनिल
४. मा.ममता विनायक गायकवाड
५. मा.करुणा शेखर चिंचवडे
६. मा.लोंढे नम्रता योगेश
७. मा.गीता सुशिल मंचरकर
८. मा.खानोलकर प्रज्ञा महेश
९. मा.चोंधे आरती सुरेश
१०. मा.संतोष (आण्णा) ज्ञानेश्वर लोंढे
११. मा.लांडगे राजेंद्र किसनराव
१२. मा.पंकज दत्तात्रय भालेकर
१३. मा.कलाटे मयुर पांडूरंग
१४. मा.कलाटे राहुल तानाजी
१५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

या शिवाय मा.श्रावण हर्डिकर – आयुक्त, मा.पाटील – अति.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.कुंभोजकर - मुख्य लेखापरिक्षक, मा.पाटील – प्र.शहर अभियंता, मा.पवार - उपसंचालक नगररचना, मा.कोळंबे - मुख्य लेखा अधिकारी, मा.डॉ.रॉय – आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.तुपे, मा.निकम – शह शहर अभियंता, मा.सवणे – प्र.सह शहर अभियंता, मा.चितळे, मा.आष्टीकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.लोणकर, मा.खोत, मा.बोदडे - सहाय्यक आयुक्त, मा.राऊत, मा.दांगट – प्र.सहाय्यक आयुक्त, मा.साळुंके - मुख्य उद्यान अधिक्षक,

मा.पाटील - प्राचार्य, औ.प्र.कैंद्र, मा.शिंदे – प्रशासन अधिकारी (प्रथमिक शिक्षण), मा.मुंढे - प्र.शिक्षणाधिकारी (माध्यमिक शिक्षण विभाग), मा.पोमण – मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, मा.डॉ.साळवे – अति.आरोग्य वैद्यकिय अधिकारी, मा.डॉ.वाबळे – अधिष्ठाता YCMH, मा.इंगळे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.जुंधारे, मा.गलबले, मा.घोडे, मा.ओंभासे, मा.गट्टूवार, मा.भोसले, मा.घुबे, मा.पवार, मा.देशमुख, मा.धानोरकर, मा.सेठीया, मा.फुटाणे, मा.राणे, मा.वाघुंडे, मा.पोरेड्डी - कार्यकारी अभियंता, मा.डॉ.दगडे - पशुवैद्यकीय अधिकारी, मा.जगताप – कामगार कल्याण अधिकारी, मा.जरांडे – सुरक्षा अधिकारी, मा.ऐवले – समाज विकास अधिकारी, मा.गोफणे – आरोग्य अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करून घेणेत आले –**

विषय क्र.३०) पिंपरी चिंचवड म.न.पा. चे ग प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेबाबत.

विषय क्र.३१) प्रभाग क्र.२ मधील रस्त्यावरील दिवाबत्तीचे नूतनीकरण करणेबाबत.

विषय क्र.३२) पिं.चिं.मनपाच्या भक्ती शक्ती येथील पुणे महानगर परिवहन मंडळाचे बस डेपो या ठिकाणी अधिक उच्च दाब विजभार घेणेकामी सुरक्षा ठेव १.३% पर्यवेक्षण शिल्क व इतर आकार असे एकूण र.रू.८०,७१,५१६/- तातडीने महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनीस मुख्य कार्यालयाकडील स्ट्रीट लाईट विज बिले या लेखाशिर्षामधून अदा करणेबाबत.

विषय क्र.३३) पिं.चिं.मनपा. पर्यावरण विभागात मैलाशुध्दीकरण केंद्र आणि सांडपाण्यावर प्रक्रिया करून पाण्याचा पुर्नवापर करण्याकरिता अनुभवी सल्लगार नेमणेबाबत. - मा.संतोष लोंढे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

विषय क्र.३४) भोसरी येथे दि.२१ जुलै ते २९ जुलै २०१९ रोजी होणा-या हवाई दलाच्या (Air force) कार्यक्रमाबाबत.- मा.राजेंद्र लांडगे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव

----------

(मा.राजन पाटील - प्र.शहर अभियंता, मा.सतिश इंगळे, मा.शिरीष पोरेड्डी, मा.राजेंद्र राणे – कार्यकारी अभियंता बाधकाम विभाग व मा.प्रविण आष्टीकर, मा.चितळे सहा.आयुक्त, मा.दिलिप आढारी, प्रशासन अधिकारी, मा.राजेश ठाकर, मा.नेदकिशोर वाघ, मा.श्रीकांत कोळप – सहा. मंडलाधिकारी – करसंकलन विभाग यांचा मा.स्थायी समितीच्या वतीने मा.सभापती, स्थायी समिती आणि मा.आयुक्त यांचे हस्ते पुस्तक देऊन सत्कार करण्यात आला.)

----------

ठराव क्रमांक - ५०३५ विषय क्रमांक – ०१
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – स्थापत्य इ मुख्यालय
सूचक – मा.शितल शिंदे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.शहर अभियंता यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/इ-मुख्य/१३१/१९ दि.१४/०५/२०१९

मा.शहर अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.81/11/2018-19 अन्वये प्रभाग क्र.४ बोपखेल रामनगर येथे नविन शौचालय पुरुष स्वच्छतागृह बांधणेकामी मे.एस.बी.सवई नि.र.रू.41,54,370/- (अक्षरी र.रू.एक्केचाळीस लाख चोपन्न हजार तीनशे सत्तर फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.40,97,279/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.40,97,279/- पेक्षा 18.18% कमी म्हणजेच र.रु.33,52,394/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.24,441/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.32,650/- = एकुण र.रु.34,09,485/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०३६ विषय क्रमांक – ०२
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.विमुका/८/कावि/४०४/१९ दि.२६/०६/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.44/01/2018-19 अन्वये पिंपळे गुरव येथील राजमाता जिजाऊ उद्यानात संगीत कारंजे बसविणे व विद्युत विषयक कामे करणेकामी मे.एस.टी.इलेक्ट्रीकल्स प्रा.लि. नि.र.रू.4,14,99,335/- (अक्षरी र.रू.चार कोटी चौदा लाख नव्याण्णव हजार तिनशे पस्तीस फक्त) पेक्षा 3.01% कमी या ठेकेदाराकडुन काम करून घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०३७ विषय क्रमांक – ०३
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – उद्यान
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.उद्यान/६/कावि/५२६/१९ दि.२६/०६/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या उद्यान विभागाकडील निविदा नोटीस क्र.९/२०१८-१९ अन्वये उदयान विभागासाठी उदयानात पाणीपुरवठा करणेकामी जुन्या बोअरवेल दुरुस्त करणे व आवश्यकतेनुसार नविन बोअरवेल घेणेबाबत मे.जीवनधारा टयुबवेल कंपनी या ठेकेदारांची निविदा र.रू.१४,९९,७९२/- (अक्षरी र.रू.चौदा लाख नव्याण्णव हजार सातशे ब्याण्णव फक्त) पेक्षा -१% टक्के ने कमी दराची निविदा मंजुर दराने १ वर्ष कालावधीसाठी येणारा खर्च र.रु.१४,८४,७९४/- (अक्षरी र.रु.चौदा लाख चौ-याऐंशी हजार सातशे चौ-याण्णव फक्त) प्रमाणे स्विकृत करुन निविदेतील नियम अटी/शर्तीस अधिन राहुन करारनामा करणेत आला असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०३८ विषय क्रमांक – ०४
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – स्थापत्य फ मुख्यालय
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.आरती चोंधे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/फ-मुख्य/२३४/१९ दि.०६/०७/२०१९

विषय – प्रभाग क्र.11 मधील पुर्णानगर येथील से.क्र.18 सी.डी.सी.मधील मोकळी जागा क्र.4 पर्यटन केंद्राच्या धर्तीवर विकसीत करणेबाबत.

विषय क्र.४ चा विचार पुढील सभेचेवेळी करणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०३९ विषय क्रमांक – ०५
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/फार्मा/१/कावि/७०/१९ दि.०६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड मनपाचे सर्व दवाखाने/रूग्णालय यांना आवश्यक औषधे/साहित्याचा पुरवठा मध्यवर्ती औषध भांडार विभागामार्फत करणेत येतो. तथापि मनपाचे दवाखाने/रूग्णालयास काही औषधे/साहित्याचा पुरवठा मध्यवर्ती औषध भांडार कडून न झालेस

आवश्यकते नुसार दवाखाने/रूग्णालये यांना तातडीने आवश्यक औषधे/साहित्य उपलब्ध होणेकामी इ.निविदा सूचना क्र.१/२०१६-१७ वाय.सी.एम. रूग्णालय औषध भांडार अन्वये र.रू.५०,००,०००/- (अक्षरी र.रू.पन्नास लाख फक्त) दोन वर्षाकरिता दि.०९/०८/२०१७ ते दि.०८/०८/२०१९ या कालावधीसाठी मे.कोठारी मेडिकल, संत तुकाराम नगर, पिंपरी १८ ही एजन्सी निश्चित करणेत आलेली आहे. मा.स्थायी समितीने ठराव क्र.२७६ दि.०३/०५/२०१७ अन्वये र.रू.५०,००,०००/- अथवा प्रत्यक्ष होणा-या खर्चास मान्यता दिलेली आहे मे.कोठारी मेडिकल या एजन्सीने पुरवठा केलेल्या तातडीक औषधे/ साहित्याकरिता माहे मार्च २०१९ अखेर र.रू.५०,००,०००/- पर्यंत खर्च झालेला आहे. सदर निविदेची मुदत दि.०८/०८/२०१९ पर्यंत असुन निविदा कालावधी र.रू.४५,००,०००/- इतका वाढीव खर्च तातडीने खरेदी करावयांचे औषधांसाठी आपेक्षित असलेने त्यास मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४० विषय क्रमांक – ०६

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३५७/१९ दि.१४/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयातील रुग्णांची वाढती रूग्णसंख्या व त्या अनुषंगाने कामाचा वाढता व्याप विचारात घेता व सध्या उपलब्ध असलेले स्थायी अस्थापनेवरील डॉक्टरांची संख्या अपुरी असल्याने तात्पुरत्या स्वरूपात सहा महिनेकरीता एकत्रित मानधनावर २९ वरिष्ठ निवासी व ६३ कनिष्ठ निवासी डॉक्टर भरणेकामी जाहिरात क्र.१५२ दि.३०/०१/२०१९ रोजी वर्तमानपत्रात व मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करून मुलाखती करीता दि.०४/०२/२०१९ रोजी उपस्थीत झालेल्या व पात्र असलेल्या उमेदवारांच्या मुलाखतीद्वारे निवड करुन नियुक्ती केलेली आहे. सदर मंजुर असलेल्या पदांमध्ये रिक्त राहिलेल्या पदांकरीता मा.आयुक्त यांचे मान्य प्रस्तावानुसार दि.०३/०६/२०१९ रोजी मुलाखती घेऊन उपस्थित असलेल्या उमेदवारामधुन गुणवत्ता व अनुशेषानुसार निवड यादी तयार करुन रुग्णालयाची तातडीची गरज पाहता खालील प्रमाणे नियुक्ती आदेश निर्गत केलेले आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शिक्षण | प्रवर्ग व निवड | नियुक्ती विभाग | प्रति महिना विद्यावेतन/ शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.अभिजित श्रीवास्तव | एम.बी.बी.एस. | खुला- निवड खुला | सर्जरी | ४५०००/- |
| २ | डॉ.केतन राजेंद्र मालपाणी | एम.बी.बी.एस | खुला - निवड खुला | रेडिओलॉजी | ४५०००/- |
| ३ | डॉ. सुनिल शाम झोल | एम.बी.बी.एस., | अनु. जाती निवड- खुला | मेडीसीन | ४५०००/- |
| ४ | डॉ.सुयश शशीकांत डिग्गीकर | एम.बी.बी.एस | अनु.जाती-निवड अनु.जाती | मेडीसीन | ४५०००/- |

सबब वरील ४ कनिष्ठ निवासी उमेदवारांना मनपाचे यशवंतराव चव्हाण स्मृति रुग्णालयामध्ये मुळ नेमणुक आदेशातील मुदत दिनांक १९.८.२०१९ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात एकत्रितमानधनावर नेमणुक देणेबाबत व त्यांना देणेत येणा-या मानधन खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे व सदर पदे जाहिरात क्र.१५२ दि.३०/०१/२०१९ नुसार पुर्ण क्षमतेने भरली गेली नसल्याने सदरची रिक्त पदे यापुढे दि.१९.८.२०१९ पर्यंत Walk In Interview ने भरणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४१ विषय क्रमांक – ०७

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३८१/१९ दि.०१/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयामध्ये दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात २९ वरिष्ठ निवासी व ६३ कनिष्ठ निवासी पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.१५२ प्रसिध्द करून पात्र उमेदवारामधुन निवड झालेल्या उमेदवारांचे नियुक्त आदेश निर्गत केलेले आहेत. परंतु सदर रिक्त राहिलेल्या पदांकरीता दि.१७/०६/२०१९ रोजी Walk In Interview/ मुलाखतीद्वारे निवड झालेल्या खालील प्रमाणे ५ कनिष्ठ निवासी डॉक्टरांचे नियुक्तीस कार्योत्तर मान्यता देणेबाबत विचार करणे.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | शिक्षण | प्रवर्ग व निवड | नियुक्ती विभाग | प्रति महिना विद्यावेतन/ शिष्यवृत्ती |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.सबीन हसनअली मोमन | एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. | खुला- निवड खुला | गायनॅक | ५००००/- |
| २ | डॉ.अनुजा भास्कर शेवाळे | एम.बी.बी.एस | खुला - निवड खुला | बालरोग | ४५०००/- |
| ३ | डॉ.पर्वथाला साई कृष्ण | एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. | खुला - निवड खुला | बालरोग | ४५०००/- |
| ४ | डॉ.चंदा शामराव सुवर्णकार | एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. | खुला - निवड खुला | गायनॅक | ५००००/- |
| ५ | डॉ.प्रविण विजयकुमार वेदपाठक | एम.बी.बी.एस.डी.जी.ओ. | ओबीसी-निवड-ओबीसी | गायनॅक | ५००००/- |

सबब वरील ५ कनिष्ठ निवासी उमेदवारांना मनपाचे वायसीएमएच मध्ये मुळ नेमणुक आदेशातील अंतीम मुदत दि.१९/०८/२०१९ पर्यंत तात्पुरत्या स्वरूपात एकत्रित मानधनावर उक्त नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून नेमणूक देणेस व त्यांना देणेत येणाऱ्या मानधन खर्चास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४२ विषय क्रमांक – ०८
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३७७/१९ दि.२९/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती घेऊन पात्र उमेदवारांना आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/५५८/२०१८ दि.२९/११/२०१८ अन्वये व वेळोवेळी Walk In Interview व्दारे निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचा नियुक्ती कालावधी दि.२८/०५/२०१९ रोजी संपुष्टांत आला असल्याने माहे मे २०१९ अखेर कार्यरत असलेल्या आवश्यक ११ विविध पदावरील उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/२६३/२०१९ दि.२१/०५/२०१९ अन्वये पुढील तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ दिलेली आहे. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त जागेकरीता दि.१०/०६/२०१९ रोजी Walk In Interview घेण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये खालील प्राप्त उमेदवारांची नियुक्ती करणेत आलेली असून त्याचा तपशील पुढील प्रमाणे

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | प्रवर्ग व निवड | मानधन प्र.महिना र.रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ.प्रशांत सखाराम गाडे | डी.एन.बी., MCH न्युरोसर्जन | न्युरोसर्जन | खुला | ७००००/- |
| २ | डॉ.हर्षद नामदेव गावडे | एम.एस जनरल सर्जन | सर्जन | खुला-निवड खुला | ६००००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दि.१५/०६/२०१९ ते दि.२८/०८/२०१९ अखेर नेमणुक देणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४३ विषय क्रमांक – ०९
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – वाय.सी.एम.एच.
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/३७८/१९ दि.२९/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता दरमहा एकत्रित मानधनावर तात्पुरत्या

स्वरुपात विविध कन्सलटंट पदे सहा महिने कालावधीकरीता भरणेकामी जाहिरात क्र.२८४ दि.१२/१०/२०१८ रोजी प्रसिध्द करून प्राप्त उमेदवारांच्या मुलाखती दि.२९/१०/२०१८ रोजी घेऊन पात्र उमेदवारांना नियुक्ती आदेश क्र.वायसीएमएच/७ /कावि/५५८/२०१८ दि.२९/११/२०१८ अन्वये व वेळोवेळी Walk In Interview व्दारे निवड झालेल्या उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात नियुक्ती देणेत आलेली आहे. नियुक्ती दिलेल्या उमेदवारांचा नियुक्ती कालावधी दि.२८/०५/२०१९ रोजी संपुष्टांत आला असल्याने माहे मे २०१९ अखेर कार्यरत असलेल्या व आवश्यक ११ विविध पदावरील उमेदवारांना आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/२६३/२०१९ दि.२१/०५/२०१९ अन्वये पुढील तीन महिने कालावधीसाठी नियुक्ती आदेश दिलेला आहे. परंतु जी पदे पुर्ण क्षमतेने भरली गेली नाहीत अशी रिक्त जागेकरीता दि.२७/०५/२०१९ व दि.०३/०६/२०१९ रोजी Walk In Interview घेण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये खालील प्राप्त उमेदवाराची नियुक्ती करणेत आलेली आहे.

| अ.क्र | उमेदवारांचे नाव | शैक्षणिक अर्हता | पदनाम | प्रवर्ग व निवड | मानधन र.रू प्र.महिना |
|---|---|---|---|---|---|
| १ | डॉ. फुले विजय किसन | एम.बी.बी.एस.डी.एन.बी.एम.डी | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | ओबीसी निवड-ओबीसी | ४५०००/- |
| २ | डॉ. हर्षद कमलाकर झांबरे | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | खुला-निवड खुला | ४५०००/- |
| ३ | डॉ. दायमि अस्बाह फत्तेमा | एम.बी.बी.एस | वैद्यकिय अधिकारी आय.सी.यु | खुला-निवड खुला | ४५०००/- |

वरील प्रमाणे निवड झालेल्या उमेदवारांना एकत्रित मानधनावर आदेशाच्या तारखेपासून दिनांक १४/०६/२०१९ ते दि.२८/०८/२०१९ अखेर नेमणुक देणेस कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४४ — विषय क्रमांक – १०

दिनांक – १७/०७/२०१९ — विभाग – पशु वैद्यकिय

सूचक – मा.राजेंद्र गावडे — अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.पवै/०२/कावि/१७८/२०१९ दि.०८/०७/२०१९

मा.अति. आयुक्त यांची शिफारस विचारात घेवून –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मोकाट व भटक्या कुत्र्यांची संख्या नियंत्रित ठेवणेकामी केंद्रशासनाकडील असाधारण राजपत्र क्र.९२९ दि.४/१२/२००१ चे मार्गदर्शक सुचनेनुसार या क्षेत्रात काम करणा-या व ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडिया यांचेकडे नोंदणी असलेल्या स्वयंसेवी संस्थाचे सहकार्याने श्वान संतती नियम शस्त्रक्रिया राबविणेचे धोरण निश्चित करण्यात

आले आहे. सद्य:स्थितीत कार्यरत मे.सोसायटी फॉर प्रिव्हेन्शन ऑफ क्रुएल्टी टु ॲनिमल, उदगिर व मे.ॲनिमल वेल्फेअर असोसिऐशन नवि मुंबई यांची कामकाजाची मुदत दि.०४/०७/२०१९ रोजी संपत असल्याने कामकाजाची निकड व तक्रारींची संख्या लक्षात घेता त्यांचे कामकाज बंद करणे शक्य नसल्याने तसेच नविन संस्थांची नेमणूक होण्यास विलंब लागणार असल्याने कार्यरत दोन्ही संस्थांना नविन संस्थांची नेमणूक होईपर्यंत पूर्वी केलेल्या करारनाम्यातील अटी व शर्ती नुसार पूर्वीच्या दराने म्हणजेच र.रु.६९३/- प्रति श्वान नर/मादी या प्रमाणे दि.०५/०७/२०१९ पासुन पुढील १ महिना कालावधी करीता किंवा नविन संस्थांची नेमणूक होईपर्यंत या कामकाजास येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेबाबत मा.अति.आयुक्त यांची मागणी असली तरी, प्रस्तुत कामाचे मुदतवाढीचा करारनामा करून पूर्वीप्रमाणे सील करणे आवश्यक असल्याने त्याप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४५ विषय क्रमांक – ११

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – स्थापत्य ड/ग मुख्यालय

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/नि/ड मुख्य/२२६/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या स्थापत्य विभागाकडील नि.नो.क्र.88-05-2018-19 अन्वये प्रभाग क्र.२३ मध्ये स्मशान भूमी व घाटाचे नुतनीकरण करणेकामी मे.एस.बी.सवई नि.र.रू.1,66,22,580/- (अक्षरी र.रु.एक कोटी सहासष्ट लाख बावीस हजार पाचशे ऐंशी फक्त) मधुन रॉयल्टी व मटेरीयल टेस्टींग चार्जेस वगळून र.रु.1,63,99,558/- वर निविदा दर मागविणेत आले आहेत. त्यानुसार सदर काम उपरोक्त ठेकेदाराकडून र.रु.1,63,99,558/- पेक्षा 18.09% कमी दराने निविदा प्राप्त झालेली आहे. सन 2018-19 चे एस.एस.आर. दरानुसार प्राप्त निविदा स्विकृत योग्य दरापेक्षा 18.34% ने कमी येत असल्याने प्राप्त निविदा मंजूर दराने म्हणजेच र.रु.1,34,32,878/- + रॉयल्टी चार्जेस र.रु.1,38,522/- मटेरियल टेस्टींग चार्जेस र.रु.84,500/- = एकुण र.रु.1,36,55,900/- पर्यंत काम करुन घेणेस आणि नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस तसेच निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील या अटीस अधिन राहून त्यांचेबरोबर करारनामाकरुन घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४६ विषय क्रमांक – १२

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – मध्यवर्ती भांडार

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मभा/५/कावि/५३०/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या पदव्युत्तर संस्थेसाठी औषध वैद्यकशास्त्र (Medicine) व शल्य चिकित्सा (Surgery) या विषयाची एकूण ४५१ पुस्तके खरेदी करणेसाठी मे.बी.जे.मेडीकल कॉलेज को-ऑपरेटिव्ह कंन्झ्युमर स्टोअर लि., पुणे यांनी एकूण र.रु.१४,९९,६९३/- (अक्षरी र.रू.चौदा लाख नव्याण्णव हजार सहाशे त्र्याण्णव फक्त) दरपत्रक सादर केले असुन सदरचे पुस्तके खरेदी करणे आवश्यक आहेत. त्यानुसार मे.बी.जे.मेडीकल कॉलेज को-ऑपरेटिव्ह कंन्झ्युमर स्टोअर लि., पुणे यांचेकडून यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयाच्या पदव्युत्तर संस्थेसाठी औषधवैद्यकशास्त्र (Medicine) व शल्यचिकित्सा (Surgery) या विषयाची पुस्तके निविदा न मागवता, थेट पध्दतीने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ अनुसुचित प्रकरण ५(२)(२) नुसार खरेदी करणेस व सदर खरेदीसाठी होणारा खर्च र.रु.१४,९९,६९३/- ला मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४७ विषय क्रमांक – १३

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/स्था/३७४/२०१९ दि.०८/०७/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

प्रभाग क्र.२० संत तुकारामनगर मधील वायसीएम हॉस्पीटल येथे चाणक्य कार्यालयाच्या वरती दुस-या मजल्याचे विस्तारीकरण करणेकामी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या तांत्रिक सल्लागार नेमणूक करणेबाबत प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.शशि प्रभू अँण्ड असोसिएट्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेचा प्रस्ताव निविदापुर्व ०.५०% (Pre tender activity) व निविदा पश्चात १.५०% (post tender activity) कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करणेस व प्रकल्प खर्चाच्या २.००% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४८ विषय क्रमांक – १४

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – ह क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.हक्षेका/स्था/कावि/३७५/२०१९ दि.०८/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

सन २०१९-२० च्या अर्थसंकल्पातील ह क्षेत्रीय कार्यालयातील कामांच्या तरतुदीमध्ये खालील प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.३१,५०,०००/-)

| अ. क्र. | कामाचे नाव | पान क्र. | अ. क्र. | लेखाशिर्ष | सन २०१९-२० ची मुळ तरतूद | वाढ करावयाची तरतूद | घट करावयाची तरतुद | सन २०१९-२० साठी एकूण आवश्यक तरतूद |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मनपा वाय.सी.एम साठी फर्निचर पुरविणे व व्यवस्था करणे | १६ | १६ | विशेष योजना | ३,००,०००/- | ३१,५०,०००/- | ० | ३४,५०,०००/- |
| २ | वाय.सी.एम.हॉस्पीटल येथे पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमासाठी आवश्यक कामे करणे, नवजात अर्भक विभागाचे नुतनीकरण करणे. डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण करणे (भाग-२) (फेज-२) | १६ | १५ | विशेष योजना | १,००,०००,०००/- | ० | ३१,५०,०००/- | ९,६८,५०,०००/- |
| एकूण | | | | | १०,०३,००,०००/- | ३१,५०,०००/- | ३१,५०,०००/- | १०,०३,००,०००/- |

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०४९ विषय क्रमांक – १५

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – पाणीपुरवठा

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.कार्यकारी अभियंता यांचे कडील पत्र क्र.पापु/६/कावि/६६०/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.कार्यकारी अभियंता यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या पाणीपुरवठा विभागाकडील प्रस्तावा सोबतच्या प्रपत्र अ (१) मधील निविदा कामांचे अवलोकन होवुन नियमानुसार व निविदा अटी शर्ती प्रमाणे तसेच भाववाढ कलमानुसार भाववाढ देय असल्यास मटेरियलच्या निर्धारित केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/ वसुल करणे बंधनकारक राहिल या अटीस अधिन राहून ठेकेदाराबरोबर कामाचा करारनामा करुन कामाचे आदेश निर्गत केले असल्याने त्याचे अवलोकन करणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५०
विषय क्रमांक – १६
दिनांक – १७/०७/२०१९
विभाग – ब क्षेत्रीय, स्थापत्य
सूचक – मा.राजेंद्र गावडे
अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.बक्षे/स्था/कावि/४/४१/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सन २०१९-२० चे मुळ अंदाजपत्रकामध्ये प्रभाग क्र.१६ व २२ मधील भांडवली/ विशेष योजना या लेखाशिर्षाखालील प्रभाग क्र.१६ मध्ये मामुर्डी किवळे येथे नाला बांधणे व अनुषंगीक कामे करणे तसेच आर.सी.सी. कलवर्ट बांधणे, प्रभाग क्र.२२ काळेवाडी ज्योतीबानगर येथील बाजी प्रभु चौक तापकीर मळा रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे लकी बेकरी ते बीआरटी रोड पर्यंतचा डी.पी रस्ता आवश्यकतेनुसार कॉक्रीटीकरण/डांबरीकरण करणेकामी मा.सन्माननिय नगरसदस्य यांची मागणी व आवश्यकता लक्षात घेता सदर कामास वाढ/घट द्वारे तरतूद उपलब्ध करून घ्यावी लागणार आहे. त्याकरीता प्रस्तावात नमुद कामांच्या तरतूदीमध्ये वाढ/घट करून मिळणे आवश्यक आहे. उपरोक्त कामाची मा.सन्माननिय नगरसदस्य यांची मागणी आवश्यकता लक्षात घेता मनपाचे सन २०१९-२० चे मुळ अंदजापत्रकामधील तरतूदी मध्ये प्रस्तावात नमूद प्रमाणे वाढ/घट करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.२,८०,००,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५१
विषय क्रमांक – १७
दिनांक – १७/०७/२०१९
विभाग – मध्यवर्ती औषध भांडार
सूचक – मा.राजेंद्र गावडे
अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.मऔभां/१/कावि/१६१/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरलिकेच्या दवाखाने/रुग्णालयांमध्ये श्वान दंश झालेल्या रूग्णांवर वैद्यकिय उपचार केले जातात. श्वानदंश झालेल्या रुग्णांचे उपचाराकरीता Inj. Anti Rabies I/M,I/D ची आवश्यकता असते. सदर औषधांच्या खरेदीकामी निश्चित केलेल्या एजन्सीची मुदत संपूष्टात आल्याने व नविन निविदा कार्यवाही पुर्ण झाली नसलेने तसेच सर्व रूग्णालये/दवाखाने यांचे कडुन सदर इंजेक्शनची मागणी होत असल्याने रूग्णांच्या वैद्यकिय उपचाराकरीता सदर इंजेक्शनची खरेदी ५ टप्प्यात वेळोवेळी करण्यात आली असून याकामी र.रू.१३,९६,०११/- (अक्षरी र.रू.तेरा लाख शहाण्णव हजार अकरा फक्त) इतका खर्च होत असून त्यास कार्योत्तर मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५२ विषय क्रमांक – १८

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – जलशुध्दीकरण केंद्र २३

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.जशुके/वि/०४/८१/२०१९ दि.०८/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पाणीपुरवठा विभागाकडील शुध्द अशुध्द जलउपसा केंद्र से.२३ भांडवली कामांसाठी सन २०१९-२० करीता र.रू.७,००,००,०००/- इतकी तरतूद आहे. सदरचे नविन कामांपैकी आवश्यकते प्रमाणे निविदा काढावयास व चालू असलेल्या कामांसाठी कमी असलेल्या तरतुदीचे अंतर्गत वर्गीकरण करून पुरेशी कामनिहाय तरतूद करणे आवश्यक आहे. तरी प्रस्तावात नमूद १ ते १६ कामांसाठी वाढ/ घट करून आवश्यक त्या तरतुदीचे वर्गीकरण करणेस मान्यता देणेत येत आहे. (वाढ/घट र.रू.१,५७,४५,०००/-)

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५३ विषय क्रमांक – १९

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – फ क्षेत्रीय, स्थापत्य

सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे

संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.फक्षेका/स्था/कावि/३८३/२०१९ दि.२७/०६/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या फ क्षेत्रिय कार्यालयाचे कार्यक्षेत्राअंतर्गत विविध विकास कामे सन २०१९-२० चे अर्थसंकल्पामध्ये प्रस्तावित केलेली आहेत. सदर प्रस्तावीत विकास कामे हि वैशिष्ट्यपूर्ण स्वरूपाची आहेत व त्यात प्रभाग क्र.१ चिखली मधील मनपाच्या विकास योजनेतील ताब्यात आलेला राधास्वामी आश्रम रस्ता आकर्षक व नावीन्यपूर्ण संकल्पना राबवून विकसित करणे, रस्त्यांचे सुशोभीकरण करणे, वाहतूक नियमांशी सुसंगत अशी वाहतूक बेटे निर्माण करणे तसेच इतर वाहतूक सोई सुविधा अद्यायावत करणे व प्रभाग क्र.१२ मधील स्मशानभूमी विकसित करणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदरची कामे वैशिष्ठपुर्ण स्वरूपाची असल्याने प्रस्तावात नमूद प्रमाणे मनपाच्या वास्तुविशारद पॅनेलवर असलेले या क्षेत्रातील तज्ञ वास्तुविशारद यांची नेमणुक करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने मा.शहर अभियंता सो. यांचे दालनात दि.१८/०६/२०१८ रोजी झालेल्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे वास्तुविशारद व प्रकल्प सल्लागार यांची नियुक्ती करणेकरिता आवश्यक असलेली दरपत्रके मागविणेकरिता कोटेशन नोटीस इकडील विभागामार्फत मनपाच्या अधिकृत संकेतस्थळावर दि.१२/०६/२०१९ रोजी प्रसिध्द करणेत आली होती. त्यातील लघुत्तम दर (जीएसटी वगळता) सादर केलेल्या वास्तुविशारद/प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचेतर्फे त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कामाकरिता नेमणूक करणेबाबतचा खालील प्रस्ताव सादर करणेत येत आहे.

| अ.क्र | कामाचे नाव | एकक | वास्तुविशारद /प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे नाव | प्राप्त दर (%) (जी.एस.टी. शिवाय) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | निविदा पुर्व कामाकरिता | निविदा पश्चात कामाकरिता | एकूण |
| १ | प्रभाग क्र.१ चिखली येथील राधास्वामी आश्रम येथील २४ मी.डी.पी. रस्ता विकसित करणे (टप्पा २) | % प्रती काम | मे.स्वराज इंजि. कन्सलटंट | ०.७५ | १.०० | १.७५ |
| २ | प्रभाग क्र.१२ तळवडे येथे नव्याने स्मशानभूमी बांधणे (भाग २) | % प्रती काम | मे.नियोजन कन्सलटंट | ०.७० | १.२८ | १.९८ |

तरी उपरोक्त नमुद केलेल्या मनपाचे विकास कामांना त्यांचे नावासमोर दर्शविलेले वास्तुविशारद म्हणून नेमणूक करणेबाबत तसेच त्याकामी देय असलेली फी अदा करणे मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५४ | विषय क्रमांक – २०

दिनांक – १७/०७/२०१९ | विभाग – स्थापत्य BRTS

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.सागर आंगोळकर

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था/BRTS/कावि/६२१/२०१९ दि.१०/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत नाशिक ते वाकड बीआरटीएस कॉरीडॉर क्र.३ विकास आराखड्यानुसार ४५.०० मी. रुंदीचा रस्ता विकसित करणेत आलेला आहे. सदरचा रस्ता हा मुंबई-पुणे राष्ट्रीय महामार्ग, पुणे-नाशिक राष्ट्रीय आणि बेंगलोर द्रुतगती मार्ग यांना जोडणारा शहरातील मुख्य रस्ता आहे. सदरचा रस्ता हा हिंजवडी आयटीपार्क ला जोडणारा रस्ता असल्याने सदर रस्त्यावर वाहनांची मोठ्या प्रमाणात वर्दळ असते. सदर रस्त्यावरील वाकड गावठाण लगतची शेंडगे वस्ती ते वाकड चौक ४००.०० मी. लांबी आणि २२.५० मी. रुंदीकरणाचे कामाची जागा न्यायप्रविष्ट असल्याने सदर ठिकाणी रुंदी करणाचे काम करता आले नाही. त्यामुळे वाकड चौक येथे मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होत आहे. त्यामुळे सदरचा रस्ता विकसित करणेबाबत मा.नगरसदस्य मागणी करीत आहे. व तसेच स्थानिक नागरिकांनी परस्पर संमती दिल्यामुळे मनपाने सदरचा रस्त्याचा भाग विकसित करणेचे ठरविले आहे. सदर नाशिक फाटा ते वाकड बीआरटीएस रस्त्यावर शेंडगे वस्ती ते वाकड चौक येथील रस्त्याचे उर्वरीत काम करणेसाठी मा.महापालिका सभा ठराव क्र.४१८ दि.१५/०६/२०१९ अन्वये र.रु.१० कोटीची प्रशासकीय मान्यता देणेत आली आहे. सदर रुंदीकरणाची काम करणेसाठी परिसराचे नियोजन करुन आराखडे तयार करणे, दरपृथ्थकरण करणे, निविदा पुर्व (Pre-Tender) आणि निविदा पश्चात (Post

Tender) इतर कामे करावी लागणार आहे. त्यासाठी अश्या प्रकारच्या कामांचा अनुभव असणारे व मनपाचे सल्लागार पॅनेलवर असणारे मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इंजि. प्रा.लि. यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | प्रकल्प सल्लागाराचे नाव | फी |
|---|---|---|---|
| १ | नाशिक फाटा ते वाकड बीआरटी रस्त्यावर शेडगे वस्ती वाकड चौक येथील रस्त्याचे उर्वरीत काम करणे. | मे.इन्फ्राकिंग कन्सल्टिंग इजि. प्रा.लि. | २% |

मनपाच्या मान्य प्रस्तावानुसार व शासन निर्णयानुसार प्री टेंडर व पोस्ट टेंडर साठी खालील तक्त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना फी अदा करावी लागणार आहे.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (प्रकल्प किंमतीच्या प्रमाणात) | |
|---|---|---|---|
| | | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियानांतर्गत प्रकल्पासाठी | इतर सर्व कामांसाठी |
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०७५%(डीपीआर ०.५०%+ प्र.मा.-०.२५%) | ०.५० (डीपीआर ०.३३% +प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.२५% | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४०% | ०.२७ |
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.६०% | ०.३० |
| ७ | सेवाहमी कालावधीकरीता | - | ०.१० |
| | **एकुण** | ३.००% | २.००% |

उपरोक्त नमुद केल्यानुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नेमणुक करणेस व शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क.५४/नवि-१६, मंत्रालय, मुंबई - ४०००३२ दि.०४/०६/२०१८ व मनपाकडील मान्य प्रस्तावान्वये २.००% फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५५ विषय क्रमांक – २१

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – ई क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.ईक्षे/स्था/कावि/१२/४८४/२०१९ दि.२७/०६/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

"इ" विभागीय कार्यक्षेत्रातील सन २०१८-१९ साठी प्रभाग क्र.०३, डुडूळगांव येथील गट क्र.१८९ ते मोशी-आळंदी पर्यंतचा १८ मी. डि.पी. रस्ता विकसित करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु.१५,००,००,०००/- इतकी महानगरपालिका सभा समिती ठराव क्र.१८७; दि.२०/०४/२०१८ चे अन्वये एकत्रित अंदाजपत्रकाअंतर्गत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरचे काम तांत्रिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असल्याने प्रभाग क्र.०३, डुडूळगांव येथील गट क्र. १८९ ते मोशी-आळंदी पर्यंतचा १८ मी. डि.पी. रस्ता विकसित करणेकामी तांत्रिकदृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकनाप्रमाणे नियोजन करणे, कामाची देखरेख करणे इ. निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची कार्यकारी अभियंता यांच्या मंजुरीनुसार दरसूची दि. ०४/०९/२०१८ रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार मे. एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांचेकडून १.७३% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे मे. एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही मा. स्थायी समितीच्या मान्य ठरावा पेक्षा कमी दराने (१.७३%) प्राप्त झालेली आहे. तरी कोटेशननुसार प्राप्त झालेल्या दरानुसार सदर कामाकरिता एकूण १.७३% (०.५०% निविदापूर्व + १.२३ निविदा पश्चात) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५६ | विषय क्रमांक – २२

दिनांक – १७/०७/२०१९ | विभाग – ई क्षेत्रीय कार्यालय

सूचक – मा.राजेंद्र गावडे | अनुमोदक – मा.करूणा चिंचवडे

संदर्भ – मा.अति. आयुक्त यांचे कडील पत्र क्र.ईक्षे/स्था/कावि/१२/४८५/२०१९ दि.२७/०६/२०१९

मा.अति. आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

"इ" विभागीय कार्यक्षेत्रातील सन २०१८-१९ साठी प्रभाग क्र.०३, वडमुखवाडी गावठाण (सर्व्हे क्र.१२) ते च-होली गावठाण (सर्व्हे क्र.४६९) पर्यंतचा १८ मी.डि.पी. रस्ता विकसित करणेकामी अंदाजपत्रकीय र.रु.४०,००,००,०००/- इतकी महानगरपालिका सभा समिती ठराव क्र.१८७ दि.२०/०४/२०१८ चे अन्वये एकत्रित अंदाजपत्रका अंतर्गत प्रशासकीय मान्यता देणेत आलेली आहे. सदरचे काम तांत्रिकदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असल्याने प्रभाग क्र.०३, वडमुखवाडी गावठाण (सर्व्हे क्र.१२) ते च-होली गावठाण (सर्व्हे क्र.४६९) पर्यंतचा १८ मी.डि.पी. रस्ता विकसित करणेकामी तांत्रिकदृष्ट्या आवश्यकतेनुसार सर्व बाबींचा एकत्रित विचार करून निर्धारीत मानांकनाप्रमाणे नियोजन करणे, कामाची देखरेख करणे इ. निविदा पश्चात (Post Tender Activity) कामे करावी लागणार आहेत. त्याकरिता स्थापत्य विभागामार्फत प्रकल्प सल्लागार यांची कार्यकारी अभियंता यांच्या मंजुरीनुसार दरसूची दि.०४/०९/२०१८ रोजी मागविण्यात आल्या आहेत. त्यानुसार मे.एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांचेकडून १.४८% इतका लघुत्तम दर प्राप्त झालेला आहे. त्यानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे मे.एनव्हायरोसेफ कन्सल्टंट यांची नेमणूक करून त्याकामी लागणारी फी ही मा.स्थायी समितीच्या मान्य ठरावापेक्षा कमी दराने (१.४८%) प्राप्त झालेली आहे. तरी कोटोशन नुसार प्राप्त झालेल्या दरानुसार सदर

कामाकरिता एकूण १.४८% (०.५०% निविदापूर्व + ०.९८ निविदा पश्चात) या दराने फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५७ विषय क्रमांक – २३
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – क्रीडा
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२८६/२०१९ दि.२९/०६/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.०९ दि.१२/०७/२०१९ अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने व महाराष्ट्र राज्य रोलबॉल असोसिएशन यांच्या मान्यतेने, पिंपरी चिंचवड शहर रोलबॉल असोसिएशन यांच्या सहकार्याने सन २०१९-२० मध्ये प्रबोधनकार ठाकरे मैदानावरील स्केटिंग रिंग, यमुनानगर, निगडी येथे महापौर चषक राज्यस्तर रोलबॉल स्पर्धा २०१९-२० आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.६,९७,२०८/- (अक्षरी र.रु.सहा लाख सत्याण्णव हजार दोनशे आठ फक्त) अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेस तसेच स्पर्धा अनुषंगाने एकूण खर्च र.रु.६,९७,२०८/- मधील स्टेज मागे पडदा, टेबल खुर्च्या व्यवस्था खर्च, खेळाडू निवास व्यवस्था अनुषंगाने करावयाचा खर्च एकूण र.रु.१,२२,६००/- हा स्थापत्य विषयक खर्च, स्थापत्य विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व विद्युत स्पिकर व माईक, जनरेटर व्यवस्था खर्च र.रु.५०,०००/- हा विद्युत विषयक खर्च, विद्युत विभाग, संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस व उर्वरित स्पर्धा अनुषंगाने येणारा खर्च र.रु.५,२४,६०८/- हा क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षावर खर्ची टाकणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५८ विषय क्रमांक – २४
दिनांक – १७/०७/२०१९
सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१० दि.१२/०७/२०१९ अन्वये कु.नम्रता सुनिल तायडे, रा.वंदना निवास, गल्ली नं.४, स्पाईन रोड शरदनगर, चिखली, पुणे १४ या खेळाडूची तायक्वांदो या खेळामध्ये ६८ वजनी गटामध्ये १० वी एशियन ज्युनिअर क्युरुगी आणि ५ वी एशियन ज्युनिअर पुमसे तायक्वांन्दो चॅम्पियनशीप २०१९ अमान, जॉर्डन येथे दि.१९ ते २२ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे. या स्पर्धेत कु.नम्रता सुनिल तायडे हिची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.नम्रता सुनिल तायडे हिस मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार

र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०५९ विषय क्रमांक – २५

दिनांक – १७/०७/२०१९

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.११ दि.१२/०७/२०१९ अन्वये कु.जीवन मुरलीधर लांडगे, रा.भोसरी, पुणे या खेळाडूची ५३ वी एशियन बॉडी बिल्डींग आणि फिटनेस चॅम्पियनशीम २०१९ हर्बीन चायना येथे दि.२६ ते २९ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे.या स्पर्धेत कु.जीवन मुरलीधर लांडगे हयाची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.जीवन मुरलीधर लांडगे यास मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार र.रु.१,००,०००/-(अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०६० विषय क्रमांक – २६

दिनांक – १७/०७/२०१९

सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.आरती चोंधे

संदर्भ – मा.विकास डोळस, मा.सागर गवळी यांचा प्रस्ताव –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१२ दि.१२/०७/२०१९ अन्वये कु.राजेश सुरेश इरले, रा.पिंपळे गुरव, पुणे या खेळाडूची ५३ वी एशियन बॉडी बिल्डींग आणि फिटनेस चॅम्पियनशीम २०१९ हर्बीन चायना येथे दि.२६ ते २९ जुलै २०१९ या दरम्यान होणार आहे.या स्पर्धेत कु.राजेश सुरेश इरले हयाची निवड झालेली आहे. या अनुषंगाने कु.राजेश सुरेश इरले यास मनपाच्या क्रीडा धोरणांनुसार र.रु.१,००,०००/- (अक्षरी र.रु.एक लाख फक्त) चे आर्थिक सहाय्य देणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०६१ विषय क्रमांक – २७

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग - क्रीडा

सूचक – मा.करूणा चिंचवडे अनुमोदक – मा.राजेंद्र गावडे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.क्रीडा/४/कावि/२८०/२०१९ दि.०६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती सभा ठराव क्र.१३ दि.१२/०७/२०१९

अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, कॅरम असोसिएशन ऑफ पुणे यांच्या मान्यतेने व नव प्रगती मित्र मंडळ, इंदिरानगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३ यांच्या सहकार्याने दि.२९ ते ३१ जुलै २०१९ या काळात सकाळी ९.०० ते रात्री ८.०० या वेळेत पिंपरी चिंचवड म.न.पा.चे कै.सौ.मनीषा भोईर विरंगुळा केंद्र, प्रेमलोक पार्क, चिंचवड, पुणे ४११ ०३३ येथे महापौर चषक जिल्हास्तर कॅरम स्पर्धा २०१९-२० (पुरुष, महिला गट व जेष्ठ नागरिक गट) आयोजित करणेस व त्याकामी येणा-या अंदाजे र.रु.४,९९,३४०/- (अक्षरी र.रु.चार लाख नव्याण्णव हजार तीनशे चाळीस फक्त) चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता देणेत येत आहे. सदर खर्चातील स्थापत्य विषयक खर्च र.रु.५०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, स्थापत्य विभाग व विद्युत विषयक खर्च र.रु.२०,०००/- हा संबंधित क्षेत्रिय कार्यालय, विद्युत विभाग यांचे लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल व उर्वरीत र.रू.४,२९,३४०/- हा खर्च क्रीडा विभागाचे महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेत येईल. तसेच ट्रॉफीज, सन्मानचिन्हे खरेदी, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर, निमंत्रणपत्रिका व प्रमाणपत्रे छपाई पंच व खेळाडू यांकरिता चहा व अल्पोपहार इ. निविदा पध्दतीने अथवा कोटेशन नोटीस प्रसिध्द करून करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०६२ विषय क्रमांक – २८
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – स्थापत्य उद्यान
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.झामाबाई बारणे
संदर्भ – मा.अति.आयुक्त यांचे कडील पत्र क्र.स्था.उ/कावि/१७५/२०१९ दि.११/०७/२०१९

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

लक्ष्मीबाई बारणे उद्यानाचे नुतनीकरण, आराखडे व अंदाजपत्रक बनविणे इ. कामे मे.शिल्पी आर्किटेक्ट & प्लॅनर्स यांनी मान्य केलेले दरानुसार स्थापत्य विषयक कामासाठी १.९७% व हॉर्टीकल्चर विषयक कामासाठी ०.९७% दराने काम करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक - ५०६३ विषय क्रमांक – २९
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – नगरसचिव
सूचक – मा.आरती चोंधे अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.नगरसचिव यांचे कडील पत्र क्र.नस/१/कावि/१०७५/२०१९ दि.१२/०७/२०१९

मा.नगरसचिव यांनी शिफारस केले प्रमाणे –

नगरसचिव विभागामध्ये कार्यरत असणा-या कर्मचा-यांनी रजा मंजुरीकामी सादर केलेल्या विनंती अर्जानुसार प्रस्तावात नमूद प्रमाणे प्रपत्र अ मध्ये दर्शविले प्रमाणे रजा मंजुरीस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

**सभा कामकाजात दाखल करून घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक - ५०६४ विषय क्रमांक – ३०
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – ग क्षेत्रीय, जलनि:सारण
सूचक – मा.राजेंद्र गावडे अनुमोदक – मा.सागर आंगोळकर
संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.गक्षे/जनि/ग१/२२४/२०१९ दि.०९/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड म.न.पा.चे ग प्रभागातील जलनि:सारण नलिकांची वार्षिक ठेकेदारी पध्दतीने साफसफाई करणे व चोकअप काढणेचे काम मे.विशाल सिव्हील कॉन्ट्रक्टर हे करीत आहेत. सदर कामाचे निविदा अटी शर्ती(A) मधील अट क्र.४ नुसार निविदेचा कालावधी हा ५ वर्ष आहे. तसेच कामाचा आदेश १ वर्षासाठी घ्यावयाचा आहे. त्यानंतर कामाची प्रगती व कामगिरी (performance) विचारात घेवून पुढील प्रत्येक वर्षासाठी मा.स्थायी समितीच्या मान्यतेने मुदतवाढ देणेत येईल असे नमुद करणेत आलेले आहे. त्यानुसार सदरच्या निविदेस मा.स्थायी समितीचे ठराव क्र.२८७१ दि.२८/०७/२०११ अन्वये मंजूरी मिळाली आहे. मा.स्थायी समिती ठराव नुसार सदर कामांस १ वर्ष कालावधीसाठी निविदा र.रु.९८,९३,१००/- साठी २.००% कमी या दराने म्हणजेच र.रु.९६,९५,२३८/- (अक्षरी र.रू.शहाण्णव लाख पंच्याण्णव हजार दोनशे अडोतीस फक्त) इतक्या खर्चास मान्यता मिळाली आहे. ठेकेदार मे.विशाल सिव्हील कॉन्ट्रक्टर यांनी सदरचे काम समाधानकारकरित्या पुर्ण केले आहे. सद्यस्थितीत प्रथम वर्षाची मुदत पुर्ण होत असल्याने पुढील १ वर्षाकरिता (द्वितीय वर्ष) मा.स्थायी समितीची मंजुरी आवश्यक आहे. तसेच सदर कामातील मूळ निविदा अटी व शर्ती (A) मधील अट क्र.४ नुसार १ वर्षानंतर पुढिल प्रत्येक वर्षासाठी मुदतवाढ देणेची तरतूद आहे. त्यानुसार पुढिल १ वर्ष कालावधीसाठी ठेकेदार यांना र.रु.९६,९५,२३८/- पर्यंत काम करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०६५ विषय क्रमांक – ३१
दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – विद्युत मुख्यालय
सूचक – मा.सागर आंगोळकर अनुमोदक – मा.नम्रता लोंढे
संदर्भ – मा.अति.आयुक्त(१) यांचे कडील पत्र क्र.विमुका/५/कावि/३६५/२०१९ दि.१०/०७/२०१९

मा.अति.आयुक्त(१) यांनी शिफारस केले प्रमाणे –

मनपाच्या विद्युत विभागाकडील नि.नो.क्र.Ele/Ho/C/45/2/2018-19 अन्वये प्रभाग क्र.२ मधील रस्त्यावरील दिवाबतीचे नूतनीकरण करणेकामी राधा इलेक्ट्रीकल्स नि.र.रू.1,33,89,871/- (अक्षरी र.रु.एक कोटी तेहतीस लाख एकोणनव्वद हजार आठशे एकाहत्तर फक्त) पेक्षा 21.7% कमी

या ठेकेदाराकडुन निविदा मंजूर दराने र.रू.1,04,84,269/- पर्यंत काम करून घेणेस, निविदा अटींनुसार भाववाढ कलम लागू असलेस, भाववाढ कलमानुसार मटेरियलच्या निर्धारीत केलेल्या बेसिक दरामध्ये कंत्राट कालावधीमध्ये झालेली वाढ/घट दरानुसार फरकाची रक्कम अदा/वसुल करणे बंधनकारक राहील. तसेच नियमानुसार व निविदेतील निविदा अटीप्रमाणे त्यावरील वस्तु व सेवा कर अदा करणेस या अटीस अधिन राहुन त्यांचेबरोबर करारनामा करून घेणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०६६ विषय क्रमांक – ३२

दिनांक – १७/०७/२०१९ विभाग – अ क्षेत्रीय, विद्युत

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.महापालिका आयुक्त यांचे कडील पत्र क्र.अक्षेका/१/कावि/४२४/१९ दि.१६/०७/२०१९

मा.महापालिका आयुक्त यांनी शिफारस केले प्रमाणे –

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या भक्ती शक्ती या ठिकाणी भक्ती शक्ती बस डेपो येथे ई बसेस चार्जिंग करिता तातडीने एकूण 2.5MVA (2500KVA) अधिक उच्चदाब वीजपुरवठा उपलब्ध करणे आवश्यक आहे. मा.अध्याक्ष व व्यवस्थापकीय संचालक, पुणे महानगर परिवहन महामंडळ लिं. यांनी इ चार्जिंगसाठी मनपाकडीन विद्युत विषयक कामे करणेची विनंती केली आहे. महावितरण कं लि. यांनी सदर ठिकाणी आवश्यक व वाढीव लोड साठी लागणारे साहित्य यांचे अंदाजपत्रक वआवश्यक शुल्क भरणेकामी कळविले आहे. सदर अधिक उच्चदाब वीजपुरवठा करणे करिता सुरक्षा ठेव, पर्यवेक्षण शुल्क १.३% व इतर आकार असे एकूण र.रू.८०,७१,५१६/- (अक्षरी र.रू.ऐंशी लाख एक्काहत्तर हजार पाचशे सोळा फक्त) तातडीने भरणे आवश्यक आहे. सदरचा खर्च मुख्य कार्यालयाकडील स्ट्रीट लाईट विज बिले या लेखाशिर्षामधून अदा करणेस मान्यता देणेत येत आहे. उपरोक्त नमूद ठिकाणी वीजभार मंजूर करणेकरिता म.रा.वि.वि.कं.लि. यांस र.रू.८०,७१,५१६/- (अक्षरी र.रू.ऐंशी लाख एक्काहत्तर हजार पाचशे सोळा फक्त) तातडीने अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०६७ विषय क्रमांक – ३३

दिनांक – १७/०७/२०१९

सूचक – मा.संतोष लोंढे अनुमोदक – मा.राजेंद्र लांडगे

संदर्भ – मा.संतोष लोंढे, मा.राजेंद्र लांडगे यांचा प्रस्ताव

पिं.चिं.म.न.पा. हद्दीतील जलप्रदुषण रोखण्यासाठी नागरी भागात तयार होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करण्याच्या व प्रक्रिया करून पाण्याचा पुर्नवापर पिण्याशिवाय अन्य करणांसाठी करणे शक्य होणार आहे. सदर कामाकरिता अनुभवी सल्लगाराची पर्यावरण विभागात

आवश्यकता आहे. तरी सदर कामाकरिता Survey सादर करून DPR व निविदा काढणेकामी पर्यावरण विभागात अनुभवी सल्लागार नेमणूक करणे आवश्यक आहे. तरी वरील विषयांकित कामाकरिता M/s. BLUESTREAM INFRASTRUCTURE DEVELOPMENT CONSULTANT PRIVATE LIMITED यांची पर्यावरण विभागात सल्लगार म्हणून नेमणूक करणेस व त्यांना पिं.चिं.म.न.पा नियमानुसार फी अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

---------

ठराव क्रमांक - ५०६८ विषय क्रमांक – ३४

दिनांक – १७/०७/२०१९

सूचक – मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक – मा.संतोष लोंढे

संदर्भ – मा.राजेंद्र लांडगे, मा.संतोष लोंढे यांचा प्रस्ताव

भोसरी येथे दि.२१/०७/२०१९ ते दि.२९/०७/२०१९ ह्या दरम्यान भारताच्या हवाई दलाचे मोठ्या प्रमाणात भरती अभियान भोसरी येथील अंकुशराव लांडगे नाट्यगृह व भोसरी गावजत्रा मैदानात होणार आहे. याचा फायदा भोसरी व पिंपरी चिंचवड हद्दीतील सर्व नागरिकांना होणार आहे व ह्या राष्ट्रीय हिताचे कार्यक्रमास मनपाने मदत करणे आवश्यक आहे. सदर कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर असल्याने हवाई दलास मनपा कडून मांडव, विद्युत व्यवस्था इ. बाबत सर्व त-हेची मदत करणे आवस्यक आहे. तरी सदर कार्यक्रमासाठी योणारा प्रत्यक्ष खर्च मनपाने खालील कामामधून करणेस मान्यता देणेत येत आहे.

१) स्थापत्य विषयक कामे –

कामाचे नाव – प्रभाग क्र.७ मध्ये मनपा कार्यक्रमासाठी मंडप व्यवस्था करणे.

निविदा क्र. - ६६/५/२०१८-१९, निविदा र.रू.२२,४९,८५६/-

२) विद्युत विषयक कामे –

कामाचे नाव – १) भोसरी उप विभागातील विविध कार्यक्रमाकरिता आवश्यकतेनुसार तात्पुरत्या स्वरूपात ध्वनी व प्रकाश व्यवस्था करणे (२०१८-१९)

निविदा क्र. - विद्युत/३/१८-२०१८-२०१९, निविदा र.रू.८,४७,४२८/-

२) क प्रभागातील विविध कार्यक्रमांसाठी तात्पुरती ध्वनीक्षेपण व्यवस्था करणे.

निविदा क्र.- Ele/HO/C/28/6/2018-19, निविदा र.रू.१९,०४,९६०/-

तरी भोसरी येथे दि.२१ जुलै ते २९ जुलै २०१९ रोजी होणा-या हवाई दलाच्या (Air force) कार्यक्रमाचे काम वरील कामांतर्गत करून कामाचे होणारे प्रत्यक्ष बिल अदा करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले

**(मडिगेरी विलास हनुमंतराव)**
**सभापती**
स्थायी समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी - ४११ ०१८ नगरसचिव विभाग,
क्रमांक - नस/३/कावि/७६१/२०१९
दिनांक – १७/०७/२०१९

**(उल्हास बबनराव जगताप)**
**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकडेपुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(क्र.पापु/६/कावि/६६०/२०१९ दि.०९/०७/२०१९ विषय क्र. १५ चे लगत)

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८
पाणी पुरवठा विभाग
क्र.पापु/६/कावि/६६०/२०१९
दि. ९/०७/२०१९

प्रपत्र अ

| अ.क्र. | ठेकेदाराचे नाव | निविदा क्रमांक | कामाचे नाव | करारनामा केलेली तारिख | कामाचा आदेश क्रमांक | कामाचा ओदशाची तारीख | निविदा रक्कम | स्विकृत दर | निविदा खर्चाची मान्यतेची रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| ९ | मे. व्हँन इंजिनिअरिंग कंपनी | १७/०७/२०१८-१९ | तातडीची कामे करणे या कामाअंतर्गत श्रीनगर रहाटणी येथील पाण्याच्या टाकीकरीता बुस्टर पंप बसविणे व अनुषंगिक कामे करणे | ०३/०८/१९ | पापु/६/कावि/६३४/२०१९ | ०६/०६/२०१९ | २२,३१,४२३/- | १.८० % कमी | २१९१२५७/- |

सही/-
कार्यकारी अभियंता
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८